Marketing and Publicity Department,
Head Office
media@mahabank.co.in; cmmedia@mahabank.co.in

# प्रेस विज्ञप्ति

## बँक ऑफ महाराष्ट्रच्या पुणे शहर विभागा कडून "महाबँक महा अदालत" चे आयोजन




**पुणे, 13 डिसेंबर, 2019 :** बँक ऑफ महाराष्ट्र ने "महाबँक महा अदालत" उपक्रमाची सुरवात दिनांक 13 डिसेंबर, 2019 रोजी पुणे शहर विभागापासून केली. दिनांक 19 ते 21 डिसेंबर, 2019 या काळात बँकेच्या देशभरातील सर्व शाखांसाठी पूर्व-नियोजित तारखांना गट पद्धतीने हा उपक्रम राबविला जाईल. आज पुणे शहर विभागाच्या "महाबँक महा अदालत" मध्ये सुमारे 80 थकीत कर्जदारांनी भाग घेतला. बँक ऑफ महाराष्ट्र चे कार्यकारी संचालक श्री ए. सी. राउत यांनी ""महाबँक महा अदालत" चे उद्घाटन केले. या प्रसंगी महाप्रबंधक आणि विभागीय व्यवस्थापक श्री पी. आर. खटावकर आणि श्रीमती अपर्णा जोगळेकर, मुख्य विधि अधिकारी, बँक ऑफ महाराष्ट्र देखील उपस्थित होते.

आपल्या उद्घाटनिय संबोधनात बँकेचे कार्यकारी संचालक श्री ए. सी. राउत म्हणाले की आपल्या नियंत्रणापलिकडील काही परिस्थिती मुळे कर्ज खाते अनुत्पादक बनते. सर्वच कर्जदार कर्जबुडवे नसतात आणि बँकेच्या कर्जाची परतफेड करण्याची त्यांची इच्छा असते. त्यामुळे बँकेच्या एककिशत परतफेड योजनेचा (ओटीएस) जास्तीत जास्त थकीत कर्जधारकांनी सहभाग घेवून कर्जमुक्त होण्याचे आवाहन श्री ए. सी. राउत यांनी

Marketing and Publicity Department,
Head Office
media@mahabank.co.in; cmmedia@mahabank.co.in

कर्जदारांना केले. थकित कर्जदारांसाठी उपयुक्त ठरणारे ‘तत्काळ निर्णय’ हे या योजनेचे वैशिष्ट्य असल्याचे त्यांनी सांगितले.

श्री राउत म्हणाले की ‘बँक ऑफ महाराष्ट्र चे ब्रीद वाक्य एक परिवार एक बँक असून त्याप्रमाणेच थकित कर्जदार हे सुद्धा आमच्या महाबँक कुटुंबाचा भागच आहेत. बँकेकडे कर्ज वसूलीसाठी कायदेशीर कारवाईसह अनेक मार्ग आहेत. परंतु, थकित कर्जदारांना दीर्घ काळ चालणा-या कायदेशीर कारवाई पद्धतीच्या ऐवजी सरल सुलभ अश्या वैशिष्यपूर्ण ओटीएस योजनेव्दारे कर्जमुक्त होण्याची संधि उपलब्ध करून दिली आहे

उपस्थित सर्व कर्जदारांनी बँकेच्या या उपक्रमाचे स्वागत केले आणि ओटीएस योजनेअंतर्गत तडजोडीची तयारी दर्शवली. यापैकी काही जणांनी जागेवरच तडजोडच्या संधीचा लाभ देखील घेतला.